# मास रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग सेंटर, कोचरे

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यात कोचरे या गावी समुद्र किनाऱ्यालगत निसर्गरम्य परिसरात संस्थेच्या संशोधन व प्रशिक्षण केंद्राची टुमदार इमारत उभारण्यात आली आहे. संस्थेविषयी असलेल्या आपुलकीतून कोचरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मा. श्री. लवू नारायण गावडे यांनी स्वखर्चाने संस्थेसाठी २२ गुंठे जमिन खरेदी करुन संस्थेच्या नावे करुन दिली. या जमिनीमध्ये सिंधुदुर्गचे माजी खासदार मा. श्री सुरेश प्रभू यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून रुपये १० लाखाची आर्थिक मदत सदरची इमारत बांधण्यासाठी दिली. संस्थेचे हे केंद्र कोकणच्या विकासासाठीचे एक मार्गदर्शक केंद्र बनावे या हेतुने श्री. लवू गावडे, श्री.सच्चिदानंद जाधव, श्री.संतोष राऊळ, श्री.योगेश प्रभू, श्री.जयवंत मंत्री, आदरणिय श्रीमती मिराताई जाधव व समस्त ग्रामस्थ कोचरे यांचे बहुमोल योगदान लाभले आहे.

## व्यवस्थापन समिती

या केंद्राची व्यवस्था पहाणे, कार्यक्रमांचे नियोजन करणे आदी कामांसाठी मास संशोधन व प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सिंधुदुर्गमधिल ८ व पुणे कार्यालयाचे ३ असे एकूण ११ सदस्य आहेत. सदर समितीची रचना खालिलप्रमाणे आहे.

अध्यक्षः- श्री. लवू नारायण गावडे
सचिवः- श्री. सच्चिदानंद माधवराव जाधव
सदस्यः- श्री. संतोष भगवान राऊळ, श्री. सत्यवान शांताराम गावकर, श्री. योगेश प्रभू, सौ. रंजना राघोबा हंजनकर, सौ. संगिता शैलेश तेली, सौ. संजना सतिश राणे, श्री. गणपत शांताराम पंडित, श्री. जयवंत मंत्री, डॉ. अभय मच्छिंद्र कुदळे